# Me pahilela apghat essay in marathi 200 words

गेल्या वर्षी मी एक भयंकर ट्रक अपघात पाहिला, जो माझ्या आयुष्यातील सर्वात घाबरवणारा अनुभव होता. आम्ही गावी जाण्यासाठी एस टी बसमध्ये प्रवास करत होतो. अचानक, खिडकीतून आम्ही एका १६ चाकी ट्रकला मोठ्या आगीमध्ये जळताना पाहिले. त्या ठिकाणी रुग्णवाहिका, अग्निशमन दल, आणि वाहतूक पोलीस तत्काळ पोहोचले होते. पोलिसांनी चालकाला सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात यशस्वी झाले. आजू बाजूचा जागा पोलिसानी आणि इतर कर्मचाऱ्यांनी सुरक्शित केला. अग्निशमन दल आग वीजवण्याचा प्रयत्न करत होते. आजूबाजूचे लोक सुद्धा गाडीतून उतरून लांबून सर्व पाहत होते. मोबाइल मध्ये शूट करत होते. चालकाने सांगितलं कि ब्रेक लायनर घासून घासून त्यामध्ये आग पकडली होती.

पोलीस अधिकाऱ्यांनी जमा झालेली गर्दी एका बाजूला केली. अग्निशमन दल आग वीजवण्याचा प्रयत्न करत होते. पण थोड्याच वेळात एक मोठा आवाज आला, जणू काही बॉम्ब फुटल्याचा होता. हे ट्रकच्या इंधन टाकी फुटल्यामुळे झाला होता. कारण इंधन टाकी मध्ये शिल्लक डिझेल तसेच होते. या अपघाताने मला खूपच धक्का बसला आणि मी हे दृश्य आयुष्यभर विसरणार नाही. हे अपघाताचे वर्णन केल्यामुळे, मुलांना वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याचे महत्व पटवून देता येईल. तसेच, अशा भयंकर घटनांपासून सावध राहण्याची गरज आहे हे शिकता येईल. ट्रॅफिक नियमांचे पालन केल्यास आपण स्वतःच आपले आणि इतरांचे रक्षण करू शकतो.